Exh.24

रे. क. नं. ११/२०२६

**मे. दिवाणी न्यायाधिशसो, क. स्तर, राधानगरी**

**यांचे कोर्टात...**

१. श्री. प्रविण नामदेव ढवण वगैरे ८ ........ वादी

विरूध्द

१. श्री. प्रल्हाद बाबुराव ढवण वगैरे ६ ......... प्रतिवादी

Order-
Seen and filed.
Sd/-
Jt.C.J.J.D.,Radhanagari.
Dt. 08/04/2026

**यातील वादीतर्फे साक्षीदार यांचे**

~~निशाणी ५ चे कामी~~ **ऑफिडेव्हीट**

**ऑफिडेव्हीट**

मी यातील वादीतर्फे साक्षीदार श्री. बाबुराव धोंडीराम जाधव व. व. ५४, धंदाः शेती, रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर देवाची शपथ घेवून ॲफिडेव्हीट करतो की,

१. मला वादी, प्रतिवादी माहितीचे आहेत. तसेच मौजे नरतवडे, येथील गट नं. ५०२, ५०३, ५०४, ५०५, ५०६, ५०७ हया सर्व जमीनी माहितीच्या आहेत.

२. आमची भागीदारीमध्ये मौजे मांगेवाडी येथे रामलिंग पाणी पुरवठा कंपनी असून सदरचे स्किमचे मोटरपंप दुधगंगा नदीवर बसवून दुधगंगा नदीतील पाणी सदर मोटरपंपाने उपसा करून जमीनीखाली ४००० फुट लांबीच्या पाईपलाईनने मांगेवाडी व नरतवडे गावच्या शेतकऱ्यांना आम्ही पाणी पुरवठा करत असतो.

Assistant Suprintendent

३. यातील वादी हे आमचे स्किमचे पाणी मौजे नरतवडे येथील गट नं. ५०२ ते ५०७ एकूण क्षेत्रफळ २९.५ गुंठे ला गेली ३० वर्षे अव्याहतपणे आपल्या पिकांना घेत असून त्यांचेकडून आम्ही प्रतिगुंठयाला आकारणी करून पाणीपट्टी घेत असतो. सदरचे पाणी ऊस व इतर पिकांना वादी अव्याहतपणे घेत आलेले आहेत.

४. वर नमुद केलेल्या जमीनीशी प्रतिवादी नं. १ ते ५ यांचा कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्कसंबंध नाही. सदर जमीनीमध्ये त्यांची कधीही वहिवाट नव्हती अगर नाही.

म्हणून केले ॲफिडेव्हीट असे.

राधानगरी ता. १०.०३.२०२६

बाबुराव धोंडीराम जाधव.

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

(ॲड. डी. एम. पोतदार)

<u>प्रतिज्ञा</u>

मी यातील वादीतर्फे साक्षीदार श्री. बाबुराव धोंडीराम जाधव व. व. ५४, धंदाः शेती, रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील नमुद ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी ता. १०.०३.२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Baburao Dhondiram Jadhav
Age 54 Occu. Agri
R. Mangewadi, Tal: Radhnagari
Who identified by Shri./Smt. D. M. Potdar
Adv. Whom I Know personally
Dated 10/3/2026

Assistant Superintendent